# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

"ज्ञानतीर्थ" विष्णूपुरी, नांदेड-४३१६०६

**विद्यार्थी कल्याण व पुरस्कार सहाय्य योजना..**

## परिपत्रक

या परिपत्रक न्वये सर्व संधधितांना कळविण्यात येते की, विद्यापीठ परिक्षेत्रातील चार ही जिल्हांमध्ये सद्यास्थितीत असणारी दुष्काळी /टंचाईची परिस्थिती लक्षात घेता मा. कुलगुरू महोदयांनी विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या या विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी स्वेच्छेने आर्थिक सहाय्य करण्याबाबत आपणास केलेल्या आवाहनास अत्यंत उत्तम प्रतिसाद शिक्षक व प्रशासकीय कर्मचा-यांनी दिल्याबद्दल सर्वांचे आभार! या योजनेबाबतची माहिती व सहभागासाठीचा अर्जाचा नमुना विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

तरी सदर परिपत्रक सर्व शिक्षक व प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांचे निदर्शनास आणावे. सहभागासाठीचा अर्ज कुलगुरू कार्यालयात सादर करावा.

कुलसचिव

जा. क्र. आस्था/०३/२०१५-१६/१५३५
दि. ०३/०८/२०१५

प्रति,

१) मा. संचालक/ विभाग प्रमुख (सर्व शैक्षणिक संकुले व प्रशासकीय विभाग), प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा. संचालक, स्वा. रा. ती. म. विद्यापीठ उपकेंद्र, पेठ, लातूर.
३) मा. प्राचार्य, न्यु मॉडेल डिग्री कॉलेज, हिंगोली.
४) सिस्टीम एक्सपर्ट, युजीसी संगणक कक्ष, यांना देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

---

## विद्यार्थी कल्याण आणि पुरस्कार सहाय्य योजना
(Student Welfare and Award Scheme - SWAS)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठांतर्गत येणाऱ्या चार जिल्हयातील भाग हा शहरी, निमशहरी, ग्रामीण आणि आदिवासी स्वरूपात आहे. पर्जन्य छायेचा प्रभाव असल्यामुळे पावसाचे प्रमाण अतिशय कमी असते. त्यात ठराविक अंतराने टंचाई, दुष्काळ येत राहतो. या पार्श्वभूमिवर या भागातील उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसमोर अनेक समस्या उभ्या राहतात. त्यात आर्थिक समस्या सर्वात महत्त्वाची ठरते. अशा गरजू विद्यार्थ्यांना सहाय्य व्हावे यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने काही योजना सुरू केल्या आहेत. या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना 'फी माफी', 'मुलींना दत्तक घेण्याची योजना' त्याच प्रमाणे 'कमवा व शिका' योजनेत काम करण्याची संधी यांचा समावेश आहे. असे असले तरी गरजू विद्यार्थ्यांची संख्या अधिक असल्यामळे मदतीची गरज आहे. ही गरज लक्षात घेऊन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'विद्यार्थी कल्याण आणि पुरस्कार सहाय्य योजना' ही योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेव्दारे गरजू विद्यार्थ्यांची फी त्याचप्रमाणे पुस्तके आणि राहण्यासाठी आर्थिक सहाय्य देता येईल. इतर वेळी विद्यार्थ्यांना परिषदा, कार्यशाळा त्याचप्रमाणे स्पर्धांसाठी आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे.

या योजनेसाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामधील शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी स्वेच्छेने या योजनेसाठी अर्थ सहाय्य करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी या आवाहनास भरघोस प्रतिसाद दिला असून, शंभराहून अधिक विद्यार्थ्यांना या योजनेचा निश्चित लाभ होईल. या योजने अंतर्गत सहाय्य देण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार असून त्यामध्ये अधिकारी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी त्याचप्रमाणे समाजातील प्रतिनिधी राहणार आहेत.

या योजनेसाठी विद्यापीठाबाहेरील व्यक्तिंना आवाहन करण्यात येणार असून, त्यांच्या कडून अर्थसहाय्य घेण्यात येणार आहे. त्याहून पुढे जाऊन प्रत्येक महाविद्यालयांनी अशी किंवा अशा प्रकारची योजना तयार करून विद्यार्थ्यांना अर्थ सहाय्य उपलब्ध करून द्यावे असे आवाहन करण्यात येणार आहे. या योजनेत ज्या व्यक्तिंना अर्थसहाय्य करण्याची इच्छा आहे, त्यांनी आपले धनादेश 'वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ' यांच्या नांवे पाठवावेत. या योजनेची सुरूवात सर्वांच्या सहकार्यातून आणि सामाजिक संवेदनेतून करण्यात येत असून, त्यास व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेण्यात येईल.

*****

दिनांक :  / /२०१५

प्रति,

मा. कुलगुरू

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,

नांदेड

विषय : विद्यार्थी कल्याण व पुरस्कार सहाय्य योजने बाबत.. **(Student Welfare and Award Scheme)**

मा. महोदय,

उपरोक्त विषयी, आपणास विनंतीपूर्वक कळविण्यात येते की, आपल्या विद्यापीठ परिक्षेत्रातील विद्यार्थी जे टंचाईग्रस्त/दुष्काळग्रस्त/आर्थिक दुर्बल आहेत आणि जे विद्यापीठ संकुलात शिक्षण घेत आहेत अशा गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मी स्वेच्छेने आर्थिक मदत करू इच्छितो/इच्छिते.

तरी कृपया माझी रु.________ इतकी मदत विद्यापीठाच्या SWAS योजनेसाठी "वित्त व लेखाधिकारी, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड" यांच्या नांवे काढलेला धनाकर्ष (D.D.)/धनादेश (Cheque) क्र. ___________ दि. __________ /विद्यापीठात रोखीने भरलेली पावती क्र._________ दि. ___________ सोबत जोडली असून स्वीकारावी, ही विनंती.

आपला/आपली विश्वासू,

स्वाक्षरी : ____________________

अधिकारी/कर्मचा-याचे पूर्ण नाव :____________________

मोबाईल नं :____________________

विभागाचे नांव :____________________

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड